# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर, एम.आय.डी.सी. रोड, गडचिरोली - ४४२६०५

दुरध्वनी क्रमांक : कार्यालय : ०७१३२-२२३३२०
ईमल : *coegondwana@gmail.com*


जा. क्र. गों.वि/परीक्षावि./३१९०/२०२० | दि. १०/०९/२०२०

## परीपत्रक

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम वर्षाच्या/अंतिम सत्राच्या लेखी परीक्षेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. परीक्षा व मुल्यमापन मंडळाची झालेली सभा दि. ०५.०९.२०२०
२. मा. विद्यापरीषदेची झालेली सभा दि. ०५.०९.२०२०
३. मा. व्यवस्थापन परीषदेची झालेली सभा दि. ०६.०९.२०२०

गोंडवाना विद्यापीठातील सलंग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भीय सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार गोंडवाना विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र २०१९-२० मधील उन्हाळी २०२० परीक्षेतील पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम वर्षाच्या/अंतिम सत्राच्या लेखी परीक्षा दि. ०५.१०.२०२० पासुन संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकानुसार online MCQ (बहुपर्यायी प्रश्न) पध्दतीनूसार घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने ऑनलॉईन लेखी परीक्षेबाबत खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात येत आहे.

### शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम वर्षाच्या /अंतिम सत्राच्या लेखी परीक्षेबाबत मार्गदर्शक सुचना.

१. उन्हाळी २०२० परीक्षेतील अंतिम वर्षातील अंतिम सत्राच्या पदवी/पदव्युत्तर वर्गामधे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सदरपरीक्षा घेण्यात येईल. तसेच अंतिम वर्षातील/सत्रातील ज्या विद्यार्थ्यांचे बॅकलॉक विषय असतील अशा परीक्षा सुध्दा याचवेळी खालील पध्दतीने घेण्यात येतील व त्याचे वेळापत्रक स्वतंत्ररीत्या जाहिर करण्यात येईल.
२. सदर परीक्षा Online MCQ (बहुपर्यायी प्रश्न) पध्दतीने घेतल्या जातील.
३. सदर परीक्षा दि. ०५.१०.२०२० पासुन संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येईल.
४. विद्यार्थ्यांना सदर प्रश्नपत्रिका सोडविण्याकरीता संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकानुसार एकुण ७५ मीनीटांचा अवधी देण्यात येईल.
५. एकुण ५० बहुपर्यायी प्रश्न असतील व प्रत्येक प्रश्नाला १ गुण याप्रमाणे एकुण ५० गुणाचा पेपर असेल. चुक प्रश्नासाठी कोणतेही Negative Marking नसतील.
६. विद्यार्थ्यांना परीक्षेकरीता Online नोंदणी अनिवार्य असुन त्याकरीता Online App/Link विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि. १८.०९.२०२० नंतर उपलब्ध करुन दिली जाईल. विद्यार्थ्यांने सदर App/Link द्वारे आपला मोबाईल क्रमांक व ई-मेल आय. डी. दि. २५.०९.२०२० पर्यंत नोंदणी करणे बंधनकारक आहे.
७. परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना ॲन्ड्राईड मोबाईल फोन/लॅपटाप / डेस्कटॉप अथवा टॅबलेट इत्यादी चा वापर करावयाचा असून इंटरनेटची सुविधा आवश्यक आहे.
८. विद्यार्थ्यांना एका वेळी एकच प्रश्न दिसेल सदर प्रश्नाचे उत्तर देता अथवा न देता पुढे जाता येईल. मात्र असा प्रश्न विद्यार्थ्याने सोडविला असे गृहीत धरण्यात येईल. सदर प्रश्नाचे उत्तर बदलता येणार नाही. आधी सोडविलेले प्रश्न किंवा नंतरचे प्रश्न बघता येणार नाही
९. प्रश्नपत्रिका डाऊनलोड करता येणार नाही.
१०. विद्यार्थ्यांना कोणत्याही परीक्षा केंद्रावर न जाता स्वतःच्या सोईनुसार घराबाहेर न पडता परीक्षा देता येईल.
११. सदर परीक्षा विद्यापीठाच्या संबंधीत विषयाच्या १०० टक्के अभ्यासक्रमावर (सिलॅबस) आधारीत असेल.

१२. जिल्हास्तरावरील, तालुका स्तरावरील व निम्नशहरी भागातील महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीनेच घेण्यात येतील.

१३. विद्यापीठाच्या परीक्षेत्रातील ग्रामीण भागातील महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑफ लॉईन, MCQ with OMR पध्दतीने परीक्षा देता येईल. मात्र या भागातील महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा देण्याची ईच्छा असेल असे विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा देऊ शकतील, परंतु अशा विद्यार्थ्यांची यादी संबंधीत महाविद्यालयांना दि. २५.०९.२०२० पुर्वी विद्यापीठाकडे सादर करावी लागेल.

१४. विद्यार्थ्याने परीक्षेला सुरवात केल्यावर विजप्रवाह खंडीत झाल्यास किवा नेटवर्क संबंधात काही अडचणी आल्यास किंवा अन्य तांत्रिक अडचणी आल्यास काही वेळानंतर सुध्दा विद्यार्थ्यांना विहीत आठ तासात परत Online login करता येईल. परत login केल्यावर विद्यार्थ्याला परीक्षा ज्या टप्प्यावर खंडीत झाली असेल तिथुन पुनश्चः पुढे जाता येईल.

१५. विद्यापीठाद्वारे आयोजित लेखी परीक्षेला एखादा विद्यार्थी वैध अशा कारणामुळे बसु शकत नसल्यास अशा विद्यार्थ्यांना पुन्हा एक संधी उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर विद्यार्थ्यांना वैध कारणांची आवश्यक कागदपत्रे महाविद्यालयामार्फत प्रमाणित करुन व कारण नमुद करुन तसा प्रस्ताव विद्यापीठाकडे ०७ दिवसात सादर करावा लागेल. सदर विद्यार्थ्यांच्या परीक्षा पुन्हा Online पध्दतीनेच घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१६. कोव्हीड - १९ या साथ रोगाच्या प्रादुर्भावामुळे वरील सर्व तरतुदी या फक्त उन्हाळी २०२० साठीच असतील.

१७. उपरोक्त ऑनलाईन परीक्षेच्या पूर्वतयारी करीता दि. २५ ते ३० सप्टेंबर २०२० या कालावधीत 'Mock Test' घेण्यात येईल.

१८. परीक्षेनंतर विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांना उत्तर सुची (Answer key) पुरविल्या जाणार नाही तसेच पुर्नःमूल्यांकन केले जाणार नाही.

१९. विद्यार्थ्यांना परीक्षा प्रक्रियेसंदर्भात अडचण उद्भवल्यास विद्यार्थ्यांने संबंधित महाविद्यालयास संपर्क साधावे.

उपरोक्त मार्गदर्शक सुचनानुसार लेखी परीक्षा घेण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अनिल चिताडे)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलीपी :-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, माहितीस सविनय सादर.
२. मा. कुलसचिव कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, माहितीस सविनय सादर
३. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, माहितीस सविनय सादर
४. उपकुलसचिव (परीक्षा पूर्व/उपरांत), परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग, माहिती तथा कार्यवाहीस सादर.